## कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर येथील विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची पदे पुर्णतः कंत्राटी पद्धतीने भरणेबाबत.

--ooo--

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर या कार्यालयांतर्गत कार्यरत घटक कार्यालय पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, चंद्रपूर, भंडारा व वर्धा या कार्यालयातील ०४ विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी १९ पदे अशी एकूण २३ विधी अधिकारी पदे भरण्यासाठी खालील अटी व पात्रता असलेल्या उमेदवाराकडून ११ महिन्यांसाठी पुर्णतः कंत्राटी पद्धतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**सुचना :-**

१. पुर्णतः कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदांकरिता करावयाचे अर्ज हे विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नागपूर परिक्षेत्र, नागपूर या कार्यालयास दिनांक २६/०५/२०२३ रोजी १८.१५ वाजेपर्यंत सादर करावेत.

२. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी अधिकारी गट-ब/विधी अधिकारी असे नमुद करुन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज दिनांक २६/०५/२०२३ रोजी १८.१५ वाजेपर्यंत कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, सदर पोलीस स्टेशन जवळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर. पीन कोड क्र. ४४०००१ या पत्यावर नोंदणीकृत डाकेद्वारे पोहचेल याची दक्षता घ्यावी.

३. दिनांक २६/०५/२०२३ रोजी १८.१५ वा.नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

४. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे अर्जासोबत जोडावेत.

५. अर्जाचा नमुना (१) www.nagpurgraminpolice.gov.in (२) www.wardhapolice.gov.in (३) www.bhandarapolice.gov.in (४) www.wardhapolice.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन अर्ज परिपुर्णरित्या भरावा.

६. अर्जासोबत विहित शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात

**अटी व शर्ती :-**

१. विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदाची नेमणूक ही पुर्णतः कंत्राटी पद्धतीने असेल.

२. उमेदवाराला शासकीय अधिकारी/कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

३. सदर नेमणूका या करार नियुक्ती पद्धतीने प्रथमतः ११ महिन्यासाठी करण्यात येतील, ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा ११ महिन्यांकरीता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर त्या उमेदवारास पुनःश्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

४. निवड केलेल्या उमेदवाराने ११ महिन्यांच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. उमेदवाराची निवड लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारे करण्यात येईल. लेखी परीक्षेचा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

६. **<u>परिक्षा पध्दती (परिक्षा एकूण ७५ गुण)</u>**

(अ) लेखी परीक्षा ५० गुणांची राहील व तोंडी परीक्षा २५ गुणांची आहे.

(ब) लेखी परीक्षेत व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकुण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात येईल.

(क) नियुक्ती देणेसाठी कमीत कमी ६० % गुण असणे आवश्यक राहील.

उमेदवारांची लेखी परीक्षा खालील विषयांवर घेण्यात येईल.

- प्रचलित फौजदारी कायदे (मेजर ॲक्ट / मायनर ॲक्ट) मा. उच्च न्यायालय/मा. सर्वोच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे.
- मा. उच्च न्यायालय, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण समक्ष एखाद्या प्रकरणात दाखल करावयाचे परिच्छेद निहाय अभिप्राय किंवा शपथपत्र (संक्षिप्त स्वरुपात) तयार करणे.
- सेवाविषयक आणि फौजदारी स्वरुपांची प्रकरणे.
- लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणात किंवा फौजदारी प्रकरणा संबंधीत १९७५ मधील कलम १९७ किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम,१९९९ मध्ये मंजुरी मधील प्रकरणांत अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी, संबंधित सक्षम प्राधिका-यांस त्यांना अभियोग दाखल करण्याची परवानगी देणे किंवा न देणे याबाबत निर्णय घेता येणे सुलभ होईल अशा प्रकरणांची छाननी करण्याची क्षमता तपासणा-या प्रश्नांचा समावेश करण्यात येईल.
- लेखी परीक्षेत सेवाविषयक व फौजदारी प्रकरणांतील वेगवेगळया व महत्वांच्या मुद्यांवर सध्याची न्यायीकस्थती (Settled position of law) काय आहेत याबाबतचे प्रश्न विचारण्यात येईल.

७. लेखी परिक्षेचा व मुलाखतीचा दिनांक व वेळ उमेदवारांना नंतर पत्राद्वारे/संकेतस्थळाद्वारे/ई-मेल द्वारे/एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.

८. उमेदवारांना कोणताही प्रवास खर्च देय असणार नाही.

९. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) रु. १००/- शुल्काच्या मुद्रकांवर (बाँड पेपरवर) भरणे अनिवार्य राहील.

१०. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांना मंजुर वेतन आणि प्रवास खर्चा व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

११. उमेदवारांनी विहित शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

१२. अर्जासोबत २.५ से.मी. X २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले एक रंगीत फोटो फॉर्मवर चिटकवुन दुसरा लिफाफ्यात जोडावा.

१३. सदरील विधी अधिकारी यांच्या नेमणूका या मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या याचीका क्र.९१४५/२०१० व ९९६०/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचीका क्र.१९००८-१९००९ महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्र.२०१८२/१२ श्री नारायण तुकारामपंत जोशी आणि इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये दिनांक ०२/११/२०१२ रोजी निर्गमित केलेले अंतरीम आदेशाच्या, तसेच स्पेशल लिव्ह पिटीशन क्र.३६९६५/२०१२ व ३६९६७/२०१२ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन असतील.

१४. उमेदवारांची पात्रता, भरती प्रकिया इ. विषयी निर्णय घेण्याचा सर्व अधिकार हा निवड मंडळाला राहील व तो सर्व उमेदवारांना बंधनकरारक राहील.

**विधी अधिकारी पदसंख्या, नेमणूकीचे ठिकाण व करारातील मासिक देय रक्कम.**

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | पदनाम | पदसंख्या | एकत्रित अनुज्ञेय मासीक रक्कम + दुरध्वनी व प्रवास खर्च | नेमणूकीचे ठीकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पो.अ., नागपूर ग्रामीण | विधी अधिकारी गट "ब" | १ | रु.२५,००० +३,००० | पो.अ. कार्यालय |
| | | विधी अधिकारी | ६ | रु.२०,००० +३,००० | उपविभाग- नागपूर ग्रा., कामठी, सावनेर, काटोल, रामटेक, उमरेड |
| २ | पो.अ. वर्धा | विधी अधिकारी गट "ब" | १ | रु.२५,००० +३,००० | पो.अ. कार्यालय |
| | | विधी अधिकारी | ४ | रु.२०,००० +३,००० | उपविभाग वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगांव |
| ३ | पो.अ. भंडारा | विधी अधिकारी गट "ब" | १ | रु.२५,००० +३,००० | पो.अ. कार्यालय |
| | | विधी अधिकारी | ४ | रु.२०,००० +३,००० | उपविभाग भंडारा, तुमसर, पवनी, साकोली |
| ४ | पो.अ. चंद्रपूर | विधी अधिकारी गट "ब" | १ | रु.२५,००० +३,००० | पो.अ. कार्यालय |
| | | विधी अधिकारी | ५ | रु.२०,००० +३,००० | उपविभाग राजुरा, गडचांदूर, वरोरा, मुल, ब्रम्हपुरी |
| | | एकूण :- | २३ | | |

**पूर्णतः कंत्राटी विधी अधिकारी गट "ब" आणि विधी अधिकारी यांची शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभवः-**

**विधी अधिकारी गट "ब"**

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायाद्याचा पदवीधर असेल. तो सनद धारक असेल.

२. विधी अधिकारी गट "ब" या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थितीत तथा विभागीय चौकशी ईत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

४.उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

५. विधी अधिकारी गट "ब" या पदासाठी उमेदवाराचे वय ६० वर्षांपेक्षा जास्त नसावे.

६.जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपण् विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्य न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. तसेच शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

## विधी अधिकारी

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनद धारक असेल.
२. विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
३. उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थितीत तथा विभागीय चौकशी ईत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.
४.उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.
५. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय ६० वर्षांपेक्षा जास्त नसावे.
६.जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे् विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्य न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबंतच्या अन्य अटी लागु राहतील. तसेच शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

## पुर्णतः कंत्राटी विधी अधिकारी गट "ब" व विधी अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदा-या :-

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. सेवाविषयक/प्रशासकिय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञ पत्रे संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.
४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास समक्ष प्राधिका-यांची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.
५. जेथे शासनाचे विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन त्याअनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नमुद केलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.
८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.
९. वरीष्ठ कार्यालयाकडून जे काम करण्याबाबत आदेश दिले जातील त्या कामाची पुर्तता वेळेत करणे. तसेच वेळोवेळी देण्यात आलेले इतर काम. त्याबाबत वेगळे मानधन दिले जाणार नाही.

वरील सर्व पदे ही शासनाने वेळोवेळी आदेशित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशित झाले आहे. सदर विषयी उमेदवारांनी आपले अर्ज विहित नमुन्यात कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, सदर पोलीस स्टेशन जवळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर पीन कोड क्र. ४४०००१ या

पत्यावर दिनांक २६/५/२०२३ रोजी सायंकाळी १८.१५ वा.पर्यंत नोंदणीकृत डाकेने पोहचतील अशा बेताने पाठवावेत. सदर बाबतची संपुर्ण माहिती (१) www.nagpurgraminpolice.gov.in (२) www.wardhapolice.gov.in (३) www.bhandarapolice.gov.in (४) wwy.wardhapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

निवडप्रक्रियेबाबतची कार्यवाही करण्याचे तसेच निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव कोणत्याही टप्प्यावर कधीही रद्द करण्याचे तसेच परीक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिका-यास राहील, या बाबत सर्व संबधीतानी नोंद घ्यावी.

25-5-2023

**( डॉ. छेरिंग दोरजे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नागपूर परिक्षेत्र, नागपूर.